नाशिक
दि. ०३/०३/२०२०

# प्रेसनोट

## आलोसे नरेद्रकुमार गोविंदराव आघाव, कृषी उपसंचालक, वर्ग–१, नेमणुक जिल्हा अधिक्षक,कृषी अधिकारी कार्यालय, नाशिक यांना १,००,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांनी केलेली कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | नरेद्रकुमार गोविंदराव आघाव, कृषी उपसंचालक, वर्ग–१ जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, नाशिक,जि.नाशिक. |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १,६४,५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,००,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे जे ॲण्ड जे एक्सपोर्टस या संस्थेत कामाला असून ते विविध कंपन्याचे एक्सपोर्टस साठी लागणारे फायटो सर्टीफिकेट (पीएससी) बाबत अर्ज तयार करुन घेऊन जिल्हा कृषी अधिक्षक, नाशिक कार्यालयात सादर करुन फायटो सर्टीफिकेट मिळवून देण्याचे काम करतात. तक्रारदार यांनी त्यांचेकडे देण्यात आलेल्या विविध कंपन्याचे फायटो सर्टीफिकेटस(पीएससी) कामांचे अर्ज जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय,नाशिक येथे सादर केले होते.<br>तक्रारदार यांनी जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, नाशिक येथे जाऊन त्यांनी सादर केलेल्या अर्जाचे फायटो सर्टीफिकेटस् (पीएससी) बाबत आलोसे नरेद्रकुमार गोविंदराव आघाव, कृषी उपसंचालक यांना भेटले असता, आलोसे नरेद्रकुमार गोविंदराव आघाव यांनी तक्रारदार यांना तुम्ही सादर केलेल्या यापुर्वीच्या अर्जांचे फायटो सर्टीफिकेटस् (पीएससी) दिले आहेत सदर दिलेल्या फायटो सर्टीफिकेटस्चे मोबदल्यात प्रत्येक सर्टीफिकेटचे पाचशे रुपयांप्रमाणे एकुण १,६४,५००/–रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे नरेद्रकुमार गोविंदराव आघाव, कृषी उपसंचालक, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडून १,६४,५००/– रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणून १,००,०००/– रुपये लाचेची रक्कम आज दि. ०३/०३/२०२० रोजी जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, नाशिक येथील आलोसे यांचे कक्षामध्ये स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई–मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

3/3/2020
( सुनिल पाटील )
पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता